# छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार व कार्य

**ज्योती प्रकाश गावंडे,** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

मो.9370070834

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या उभारणीत छत्रपती शाहू महाराजांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतीय समाज रचनेत एक उतरंड होती. त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद असून उच्चवर्णीय लोक हे इंग्रजांचे गुलाम होते व ते स्वतंत्र होवून अस्पृश्यांना कनिष्ठ वर्गातील लोकांना त्यांच्या अधिन ठेवून गुलामाप्रमाणे वागवत असे. त्यामुळे समाजातील कनिष्ठ बहुजन वर्ग हा उच्चवर्णीयांच्या गुलामीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करत होता. परंतु त्याचबरोबर दुसरीकडे तो घरातील स्त्रियांना गुलाम ठेवू इच्छित होता. त्यामुळे या सर्व उत्तरंडीमध्ये स्त्रीयांचे शोषण होतं होते. त्यामुळे स्त्रियांना शिक्षित करणे व त्यांना स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठीचा एक प्रयत्न शाहू महाराजांनी केलेला दिसून येतो. महात्मा फुलेंच्या नंतर माणसांवरील अस्पृश्येतेचा कलंक मिटविण्यासाठी माणुसकीचे आणि न्यायाचे तत्व प्रबळपणे वापरणारे शाहू महाराज हे समर्थ क्रांतिकारक होते.जीवनाकडे पाहण्याची दृष्टी निकोप, स्वच्छ, समानतेची होती. शिक्षणाचा प्रचार व प्रसार केवळ त्यांनी कोल्हापूर संस्थानपुरता मर्यादित न ठेवता अखंड महाराष्ट्रात केला.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या खामगावच्या अधिवेशनात त्यांनी केलेल्या भाषणात ते म्हणतात की, ‘शिक्षणाने आमचा तरणोपाय आहे’, शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती विकास होत नाही, असे इतिहास सांगतो म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. कारण हिंदुस्थानात जाती-धर्माची बंधने ही खुप कडक आहेत व ती मोडून काढण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे हत्यार नाही, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग वंचित अशा समाजाला शिक्षण देवून व सामाजिक सुधारणेत अस्पृश्यता निवारण करून समाजात जाणीव जागृती करण्यासाठी केला.

**उद्देश्य :**

१. थोर समाज सुधारक म्हणून शाहू महाराजांच्या कार्याचा आढावा घेणे.
२. शाहू महाराजांच्या योजनांवर दृष्टीक्षेप टाकणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार योजना, व कार्य आणि समाज सुधारक म्हणून केलेले कार्य यांचा अभ्यास करण्यात येणार असून शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**जीवनपरिचय :**

महाराष्ट्रातील थोर समाज सुधारकांमध्ये अग्रस्थानी असणाऱ्या शाहु महाराजांचा जन्म कोल्हापूर येथील राजवाड्यातील कागलच्या घाटगे घराण्यात २६ जून १८७४ मध्ये झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. त्यांचे वडिलाचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाई असे होते. ज्या राजवाड्यात जन्म झाला ते स्थळ आता विश्रामधाम म्हणून ओळखले जाते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व त्यांचे नाव शाहू असे ठेवले. शिक्षण सुरू असतांनाच त्यांचा विवाह वयाच्या १७ व्या वर्षी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई यांच्याशी झालाव २ एप्रिल १८९४ रोजी राज्यारोहण समारंभ झाला. यानंतर ते १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष कोल्हापूर संस्थानचे राजे होते. त्यानंतर शेवटी ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.””[२]

**राजर्षी शाहू महाराजांचे समाजसुधारक म्हणून कार्य :**

शाहू महाराजांनी समाजात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विशेष भर दिला असून कोल्हापुरात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी इ.स. १९१९ मध्ये सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगवेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातीभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. १९१७ साली पुर्नविवाह कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी इस. १९१६ साली

निपाणी येथे ' डेक्कन रयत असोसियशन', ही संस्था स्थापन केली. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे, यातून त्यांनी कृषी विकास साध्य करण्यास चालना दिली.

रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे न्यायहक्क मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या अधिकाराचा पूर्ण वापर त्यांनी समाजातील बहुजनांना समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता , न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी केला म्हणून ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या या एकूणच कार्यावरून कानपूरच्या कुर्मी क्षेत्रिय समाजाने त्यांना 'राजर्षी' ही उपाधि दिली.[३]

शाहू महाराजांनी केलेले समाज सुधारणेचे कार्य हे अतुलनिय असून त्यांच्या विचारांची व कार्याची गरज आजही समाजाला असलेली दिसून येते. समाजातील वाढता भ्रष्टाचार, दारिद्रय, स्त्रियांचे शोषण, जातीय दंगली यामध्ये त्यांच्या विचारांचे गरज तिव्रतेने जाणवत आहे. त्यांच्या काळातील सक्तीचे व मोफत शिक्षण हे आजही लागू करण्यासारखे आहे. कारण सद्यस्थितीत ग्रामीण भागातील पटसंख्या कमी असलेल्या शाळा या बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी सक्तीचे मोफत शिक्षण ही योजना नव्याने लागू करावी म्हणून शाहू महाराजांचा विचार आजही त्याच तिव्रतेने वापरला जात आहे.

**शाहू महाराजांचे विचार व शिक्षणाविषयी कार्य :**

रयतेच्या कल्याणाचा हिताचा सदोतीत विचार करणारा आणि त्यासाठी विविध योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करणारा लोक कल्याणकारी राजा म्हणून शाहू महाराजाचे नाव समोर येते. त्यांच्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी दूरदृष्टी ठेवून विविध कामे केली. त्यांच्या त्या कार्यास आजही तोड नाही. काळाच्या पुढे जावून त्यांनी शंभर वर्षापूर्वी जे कार्य केले त्याचे महत्व आजही तितकेच आहे. शाहू महाराजांनी आपल्या अनेक भाषणातून शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट केलेली आहे. बहुजनांना त्यांनी सक्तीचे व मोफत शिक्षण केले व म्हटले की, शिक्षणानेच त्यांना तरणोपाय आहे. प्रजेतील थोडा भाग पूर्ण शिक्षित होण्यापेक्षा सर्व प्रजेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे, असे त्यांचे मत होते. नाशिक येथील भाषणत ते म्हणतात की, बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या बाबतीतील दर्जा वाढवून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीने अशंत: तरी ते आल्याशिवाय सुधारण्याच्या दृष्टीने माझ्या संस्थानाच्या कारभारात लोकास हक्क देण्याविषयीचे बदल करावयास मी मागेपुढे होणार नाही. शाहू महाराजांच्या या बोलण्यातून त्यांची शिक्षणविषयीची तळमळ व भूमिका तीव्र इच्छा स्पष्ट दिसून येते. समाजाच्या सर्वच स्तरात किमान प्राथमिक शिक्षणाची प्रस्थापना झाल्याशिवाय नवरत्न होण्याची प्रतिज्ञा करणे यातून त्यांचे शिक्षणविषय धोरण दिसून येते.

कोल्हापूर संस्थानचा स्त्री-शिक्षणविषयक दृष्टीकोनच मुळात पुरोगामी स्वरूपाचा असल्याने संस्थानातील मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी एक खास स्त्री शिक्षण अधिकाऱ्याचे पद निर्माण केले गेले व त्या ठिकाणी रख्माबाई केळकर या बुद्धीमान स्त्री ची नेमणूक केली गेली. त्यांनी संस्थानातील स्त्री शिक्षणास गती देण्याचे प्रशंसनीय कार्य केले. भुदरगडसारख्या सह्याद्री लगतच्या आदिवासी मागास भागात त्या काळी शाळा स्थापन करण्यात आली हे विशेष. मुला-मुलींच्या एकत्रित शाळांनाही त्यावेळी उत्तेजन दिले जात होते. जिथे मुलींच्या स्वतंत्र शाळा नव्हत्या तिथे एकत्रित शाळांची योजना राबवून मुला-मुलींच्या समानतेचा विचार शाहू महाराजांनी त्या काळी रुजवलेला दिसून येतो. प्रौढ शिक्षणाच्या बाबतीत ही महाराजांनी विशेष प्रयत्न केले. १९१९ मध्ये एक खास हुकमी गॅझेट केला. त्या अन्वये अशा स्त्रियांच्या राहण्याची- जेवणाची सर्व व्यवस्था दरबाराकडून मोफत केली जात होती. मुलींच्या पुढील शिक्षणासाठी खास शिष्यवृत्ती ही दरबाराने ठेवली होती. त्याचाच एक भाग म्हणून आजही विद्यार्थ्यांना सरकारकडून व विविध संस्थाकडून शिष्यवृत्ती देण्याची योजना राबविली जाते.

**राखीव जागा धोरण :**

समाजातील मागासवर्गीयासाठी आरक्षण धोरण सर्वप्रथम शाहू महाराजांनी प्रत्यक्षात आणले. बहुजन वर्गाना विकासाच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतुद केली पाहिजे, अशी कल्पना महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडली होती ही शाहू महाराजांनी प्रत्यक्षात १९०२ मध्ये आणली. कोल्हापूर संस्थानामध्ये मागास जातीसाठी ५० टक्के जागा संस्थानातील नोकऱ्यामध्ये राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला. कोल्हापूर संस्थानचे राजे असूनही त्यांनी लोकशाही पद्धतीने राज्यकारभार केला म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' अशा शब्दात शाहू महाराजाबद्दल गौरवद्गार काढले. प्राथमिक शिक्षणावर भर देवून त्यांनी शैक्षणिक चळवळीला गती दिली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून गैरहजर राहणाऱ्यांना दंड आकारण्यात आला. त्यांचा परिणामही तसा चांगला झाला. शाळेतील आकडेवारीत हळूहळू फरक दिसू लागला. प्राथमिक शाळा १८९३-९४

मध्ये १८३ होत्या. तर त्या पुढे वाढून १९२१ मध्ये ४९६ इतक्या झाल्या. तसेच १८९३ ते ९४ मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे ११०४२ होते. पुढे ते १९२१-२२ मध्ये ते २६६२८ इतके वाढले.[६]

शाहू महाराजांनी शिक्षणाबरोबरच अस्पृश्यता निवारण, जात निर्मुलन, विधवा पुर्नविवाह, बाल विवाह बंदी, सती प्रथा, देवदासी प्रथा बंदी व महिला शिक्षण या सर्वाचा देखील विकास केला व त्यांच्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य लावले.

**सारांश :**

शाहू महाराजांनी त्यांच्या काळातील सामाजिकदृष्ट्या वाईट असलेल्या परिस्थितीतही आपल्या रयतेत समानता या तत्वानुसार विचार केला आणि एक आदर्श राजा म्हणून नावलौकिक मिळवला. छत्रपती शिवाजी महाराजानंतर उत्कृष्ट राज्यकारभार चालवण्याचा मान राजर्षी शाहू महाराजांना जातो. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या विचारातून आपल्या राज्यात राज्य कारभार चालविण्याचे कार्य त्यांनी केले. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला असल्याने एकूणच त्यांच्या कार्यात फुलेंचे विचार दिसून येतात. मोफत व सक्तीचे शिक्षण, राष्ट्र उन्नतीचे शिक्षण, समानतेसाठीचे शिक्षण, आर्थिक उन्नतीचे शिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण इत्यादी प्रकारचे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले व विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह निर्माण करून त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. एकूणच शाहू महाराजांनी केलेले कार्य हे आजही तितकेच महत्वाचे असून त्यांच्या कार्याची व विचारांची गरज समाजाला आजही आहे.

**संदर्भ :**

१. नाईक तु.बा., 'छत्रपती शाहू महाराज,' मेहता पब्लिशेन हाऊस,पुणे.
२. पवार ना.ग., २००७, "शिक्षण क्षेत्रातील विचारवंत," नित्य नुतन प्रकाशन, पुणे.
३. पवार जयसिंगराव, २०१४, " राजर्षी शाहू छत्रपती जीवन कार्य," ताराराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर
४. कीर धनंजय, १९८२, 'राजर्षी शाहू छत्रपती- एक समाज क्रांतीकारक राजा,' पहिली आवृत्ती, कोल्हापूर
५. भगत रा.तु, २०१६, "राजर्षी शाहू छत्रपती-जीवन व शिक्षण कार्य,' रिया पब्लिकेशन, कोल्हापूर
६. कित्ता
७. जाधव रमेश, "लोकराजा शाहू छत्रपती',
८. लोकराज्य मासिक, सप्टेंबर २०१८
९. Mr.M.Wikipipedia.org
१०. https:dgipr.mharasatra.gov.in.com